# डॉ पाठक यांची प्राध्यापक पदी निवड
# विद्यापीठ परिक्षेत्रातील प्रथम मान

(16.09.2020) कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथील क्रीडा संचालक डॉ किशोर पाठक यांची प्राध्यापक पदासाठी पदोन्नतीने नियुक्ती करण्यात यावी अशी शिफारस विद्यापीठ निवड समितीच्या दि 16 सप्टेंबर 2020 रोजी संपन्न झालेल्या सभेत एकमताने निर्णय घेण्यात आला

सदार निवड समितीच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन श्री मिथुलालजी अग्रवाल होते तर मा कुलगुरू याचे प्रतिनिधी म्हणून नवापूर शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ लता मोरे व पाचोरा महाविद्यालयातील डॉ वासुदेव वले, मा कुलगुरू नियुक्त शिक्षणतज्ञ म्हणून पुणे विद्यापीठाचे शिक्षणशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ संजीव सोनवणे, स्वामी विवेकानंद महाविद्यालय औरंगाबाद येथील डॉ कदम, वाशिम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गुलाने, सहसंचालक डॉ सतीश देशपांडे व प्राचार्य अरविद चौधरी, व्यवस्थापन परिषद सदस्य श्री नीतीन बारी उपस्थित होते प्राध्यापक पद मिळवणारे डॉ पाठक हे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील प्रथम क्रीडा सचालक ठरले आहेत डॉ पाठक याचे संस्थेचे व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन श्री मिथुलाल अग्रवाल, व्हा चेअरमन श्री अजय जैन, सचिव श्री विकास कोटेचा, सर्व साचालक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अरविंद चौधरी, उपप्रासाचार्य डी एस पाटील , कार्यालय अधीक्षक श्री बाबुराव हिवाराळे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी **अभिनंदन** केले आहे





